# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक १७/०८/२०१८**

## १) बुलेरो महिंद्रा जिप चोरी :-

**माहुर :-** दिनांक १४.०८.२०१८ रोजी चे २१.३० ते दि. १५.०८.२०१८ चे ०५.०० वा. चे दरम्यान फिर्यादीचे घरासमोरुन माहुर, जि. नांदेड येथे, यातील फिर्यादीने बोलेरो महिंद्रा कंपनीची जिप क्रमांक एम.एच.२६/ए.डी. ५२८० किंमत अंदाजे १,५०,०००/- रुपयाची पांढऱ्या रंगाची नमुद ठिकाणावरुन कुणीतरी आज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी गौतम नारायण मेहता, वय ३३ वर्षे, व्यवसाय व्यापार रा. कपीलनगर माहुर जि. नांदेउ** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. माहुर** गुरनं १०३/२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/ ७९ राठोड , मा.क्रं. ९९२१२३५५७९** हे करीत आहेत.

## २) विवाहितेचा छळ :-

**मुखेड :-** दिनांक २८.०३.२०१३ चे ते ०६.१२.२०१८ चे दरम्यान फिर्यादीचे सासर लातुर येथे, यातील नमुद आरोपीतांनी संगनमत करुन तु दिसायला चांगली नाहीस, तुला स्वयंपाक येत नाही, तु तुझ्या माहेरहुन कार घेण्यासाठी २ लाख रुपये घेवून ये म्हणुन शिळे अन्न खाण्यास देवुन उपाशी पोटी ठेवुन, शिवीगाळ करुन अपमानीत केले, मारहाण करुन फिर्यादीचा शारीरीक व मानसिक छळ केला. वगैर वरुन **वय २० वर्षे फिर्यादी महीलेने ह. मु. होनाळा ता. मुखेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो. स्टे. मुखेड** गुरनं. २४३/२०१८ कलम ४९८(अ), ५०४, ५०६, ३४, भादविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/१६३१ पांडे , मो.क्र. ७५८८०६८२५६** हे करीत आहेत.

## ३) आय. टी. ॲक्ट :-

**उमरी :-** सन २०११ ते एप्रील २०१८ दरम्यान, सोलापुर , औरंगाबाद, बँगलोर, मुंबई, बीड, येथे, यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे जमा खाते मधुन तंत्रज्ञाचा उपयोग करुन १,१२,०००/-रुपये परस्पर उचलुन माहीती तंत्रज्ञान कायदयाचा भंग केला. वगैरे **फिर्यादी व्यंकट भगवानराव फड, वय ३८ वर्षे व्यवसाय नौकरी रा. व्यंकटेशनगर उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. उमरी** गुरनं १३५/२०१८ कलम ६६ (क), (ड) महाती तंत्रज्ञान कायदा २००० प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/ कारेगावकर, मो.क्र. ७७१९००२९२९** हे करीत आहेत.

## ४) बेकायदेशिररीत्या देशी दारू बाळगुन मिळुन आला :-

**धर्माबाद :-** दिनांक १६.०८.२०१८ रोजी चे १८.०० वा. चे सुमारास, मधुबन हॉटेल जवळ बासर रोड धर्माबाद , जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिर रित्या देशी दारु ७५० एम.एल. १० शिलबंद बॉटल किंमती २,१६५/-रुपयाचा माल हिरो होंडा पॅशन कंपनीची मो. सा. किं.अं. ३०,०००/-रु असा एकुण ३२,१६५/-रु चा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने वाहतुक करित असतांना मिळुन आला, वगैरे **फिर्यादी सपोउपनि/ आनंद प्रभाकर जोंधळे, ने. पो. स्टे. धर्माबाद** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. धर्माबाद** गुरन १८७/२०१८ कलम ६५ (ई), ८३ महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१६३२ नागुलवार, मो.क्र. ९४२१२९४१०९** हे करीत आहेत.

## ५) अंगावर चिमणी पडुन साडीने पेट घेवुन मृत्यु :-

**मुखेड :-** दिनांक १४.०८.२०१८ रोजी चे १७.०० वा. चे सुमारास स. द. विष्णुपूरी नांदेड येथे, यातील **मयत नामे शकुंतलाबाई हाणमंराव मारकवाड, वय ५० वर्षे रा. हानवडज ह. मु. नाईकनगर मुखेड जि. नांदेड** ही चिमनी पेटवीत असताना अंगावर चिमनी पडुन साडीने पेट घेवुन ८५ % जळाल्याने उपचार कामी स. द. विष्णुपूरी नांदेड येथे शरीक केले असता उपचारा दरम्यान मरण पावली. वगैरे **खबर देणार गजानन पि. हनमंतराव मारकवाड, वय ३० वर्षे व्यवसाय शेती रा. होनवडज ह. मु. नाईकनगर उमरदरी मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. मुखेड** आ.मृ. नं. ३१/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोहेकॉ/ १६४४ वडजे , मो.क्र. ९९२३७८५४५४** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.